# श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिरोळ

पो. दत्तनगर ४१६ १२०, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)

फोन नंबर : ०२३२२-२३६५५१ ते ५६ **EMAIL- dssskpo@gmail.com**

## टेंडर नोटीस (क्र. २१ /कंत्राटी कामे/२०१७-२०१८)

कारखान्याच्या सन २०१७-१८ ऊस गाळप हंगाम / वर्षाकरिता खालील कामे प्रतिवर्षाप्रमाणे मक्तेदारी पद्धतीने देण्यासाठी कंट्राटी कामाचे लायसेन्सधारक मक्तेदारांकडून सीलबंद टेंडर्स मागविण्यात येत आहेत. तेव्हा स्वारस्य असलेल्या मक्तेदारांनी कारखाना कार्यस्थळावर प्रत्यक्ष कामाचे स्वरुप समजून घेऊन आपली सीलबंद टेंडर्स रोख बयाणा रक्कम अकौंटमध्ये भरलेल्या पावतीसह वार दि. २४/१०/२०१७ इ. रोजी कार्यालयीन वेळेत अगर तत्पूर्वी कारखान्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवावीत. प्रत्येक कामासाठी वेगळे टेंडर भरावे. कोरे टेंडर फॉर्म्स कारखान्याच्या कार्यालयामध्ये दि. ०९/१०/२०१७ ते २३/१०/२०१७ अखेरपर्यत विक्रीस उपलब्ध होतील. (सुट्टीखेरीज) कोणतेही टेंडर कारण न देता मंजूर अगर नामंजूर करण्याचा हक्क व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

१)साखर पोती गोडाऊनमध्ये थप्पी मारणे व गोडाऊनमधील साखर पोती डिलीव्हरी देणे आणि अनुषंगिक कामे, २)साखर पोती अंतर्गत वाहतूक -शुगर हाऊस ते गोडाऊन (जरुरीप्रमाणे), ३)प्रेसमड वाहतूक करणे (डॉर ते प्रेसमड यार्ड), ४)प्रेसमड कंपोस्ट वाहतूक व राख,चुना,स्लज,लगून गाळ भरणी. ५)बगॅस बेलिंग (जरुरीप्रमाणे), ६) बगॅस गट्ठे वाहतूक(जरुरीप्रमाणे),७)बगॅस गट्ठे यार्डात थप्पी मारणे (जरुरीप्रमाणे), ८)गंधक व चुना ट्रकमधून उतरणी करणे. ९)गंधक सल्फर भट्टीजवळ पोहच करणे. १०)चुना पोती गोडाऊनमधून आणणे व जरुरीप्रमाणे निवळी तयार करणे, ११)चुन्यामधील पडलेले खडे/ग्रीट भरणी उतरणीसह वाहतूक करणे.१२)अ)बैलगाडी टायर पंक्चर काढणे व अनुषंगिक कामे, ब)पंक्चर टायर ट्युब वाहतूक,१३)टायर पॅचवर्क/रिमोल्ड करणे.१४)बैलगाडी अड्यातील उष्टावळ विक्री, १५) कंपोष्ट खत रांगावर स्पेंट वॉश फवारणी करणे, १६)कारखान्यास आवश्यकतेप्रमाणे जेसीबी भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणे. १७) गव्हाण कॉन्ट्रक्ट.

सदर कामांसाठी जीएसटी नोंदणी व कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्टखाली लायसेन्स (लागू असल्यास) असणे आवश्यक आहे. अ.नं.३ व ४ मधील मक्तेदारी कामासाठी मक्तेदाराच्या मालकीची स्वतःची आवश्यक ती वाहने असणे आवश्यक आहे. त्यासंबंधीची कागदपत्रे सादर केल्याशिवाय टेंडर फॉर्म दिला जाणार नाही.

तसेच वरील कामासंबंधी माहिती, शर्थी व अटी आणि बयाणा रक्कमेचा तपशील टेंडर फॉर्ममध्ये नमूद केलेला आहे. तथापी अधिक माहिती पाहिजे असल्यास कारखान्याच्या मुख्य कार्यालयामध्ये रविवार व सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

दत्तनगर - ४१६१२०
दि. ०७/१०/२०१७

**एम.व्ही.पाटील**
**कार्यकारी संचालक**

G:\MAYURI1\Tender Notice Add -Kantrati kame.doc